# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७

विना सहकार नाही उद्धार !

पारिजात
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
नवी मुंबई

# १३ वा वार्षिक अहवाल

## सन २००९-१०


प्रशासकीय कार्यालय

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

# विद्यमान संचालक मंडळ


श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष
१४.६.२०१० पर्यंत


श्री. बाळासाहेब वि. ताकवले
अध्यक्ष
१५.६.२०१० पासून


श्री. दशरथ आ. बडदे
उपाध्यक्ष
१४.६.२०१० पर्यंत


श्री. श्रीपती शं. गरुड
उपाध्यक्ष
१५.६.२०१० पासून


श्री. कृष्णा पां. धुमाळ
सचिव
१४.६.२०१० पर्यंत


श्री. दिपक शं. टेळे
सचिव
१५.६.२०१० पासून


श्री. अनंत ना. प्रभाळे
खजिनदार


श्री. अमृत दा. पाटील
संचालक


श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक


श्री. शंकर रा. पुली
संचालक


सौ. मंदा ज्ञा. खोपडे
संचालिका


श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी


श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्य. अधिकारी

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, फ्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई-४०० ७०६.

## तेराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **तेरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०१/८/२०१० रोजी सकाळी १०.०० वाजता गुरव ज्ञाती भवन,२-सी/३,सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब वि.ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. ०९ /०८ /२००९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०१० अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००९-२०१० च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.

४) सन २००८-२००९ च्या वैधानीक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.

५) सन २००९-२०१० च्या वैधानीक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.

६) सन २०१०-२०११ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.

७) सन २०१०-२०११ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने

ठिकाण : नवी मुंबई.

दिनांक : १२/७/२०१०

दिपक शंकर टेळे

(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.



# सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र

## कर्तृत्ववान महाराष्ट्र

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या महाराष्ट्राच्या या मातीने देशाला खुप काही दिले आहे. मराठी माणसाचा त्याग, मराठी माणसाचे शौर्य, मराठी माणसाची उदारता आणि मराठी माणसाची सर्वांना सामाऊन घेण्याच्या वृत्तीबाबत देशवासीयांमध्ये कोणतीही सांशकता असणार नाही. मराठी माणसाला काय काय करता येतं ?

असा जर कोणी प्रश्न विचारल्यास त्याला सांगता येईल.

- मराठी माणसाला छत्रपती शिवरायांच्या रुपात पहिले हिंदवी स्वराज्य स्थापता येते.
- मराठी माणसाला विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या रुपाने पहिली सहकारी बँक व विखे पाटील यांच्या रुपाने पहिला सहकारी कारखाना उभारता येतो.
- मराठी माणसाला सावित्रीबाईच्या रुपाने पहिली महिला शिक्षिका होता येते
- मराठी माणसाला महर्षी कर्वेच्या रुपाने संपूर्ण भारतातील पहिली मुलींची शाळा काढता येते.
- मराठी माणसाला स्वा. सावरकरांच्या रुपाने स्वातंत्र्यासाठी भर समुद्रात स्वत:ला झोकून देता येते.
- मराठी माणसाला डॉ. आनंदी जोशींच्या रुपाने पहिली महिला डॉक्टर होता येते.
- मराठी माणसाला दादासाहेब फाळकेंच्या रुपाने भारतीय चित्रपट सृष्टीची मुहूर्तमेढ रोवता येते.
- मराठी माणसाला डॉ. आंबेडकरांच्या रुपाने भारतीय राज्यघटना लिहीता येते.
- मराठी माणसाला खशाबा जाधवांच्या रुपाने भारताचा पहिला ऑलिंपीक पदक विजेता बनता येते.
- मराठी माणसाला लता दिदींच्या रुपाने पार्श्वगायनात 'गान सम्राज्ञी'होता येते.
- मराठी माणसाला सचिनच्या रुपाने क्रिकेटचा सम्राट होता येते.
- मराठी माणसाला प्रतिभाताईंच्या रुपाने पहिली महिला राष्ट्रपती होता येते.

मराठी माणसांचे कर्तृत्व सांगण्यास ही यादी तोकडीच आहे. अशा प्रकारे कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रात उत्तूंग भरारी मारणाऱ्या मराठी माणसांचा महाराष्ट्र आज सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे या सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्रात सहकाराने यापूर्वीच शतकमोहोत्सव साजरा केला आहे. आज हे क्षेत्र एवढे व्यापक झाले की कोणताही माणूस सहकार या संकल्पनेशिवाय व ती अंगी मुरवल्याशिवाय सर्वसाधारण जीवनही जगू शकत नाही.

सहकारी हौसिंग सोसायटी असो, पतसंस्था असो, बँक असो, दुध उत्पादक संस्था, शेती विषयक संस्था असो, वा सहकारी तत्वावरील कारखाने, सुत गिरण्या, वाहतुक संस्था असो, सामान्य नागरीक त्यात जोडला गेला आहे. तो संचालक मंडळ म्हणून धोरणांमध्ये सक्रीय असेल व भागधारक म्हणून संस्थेच्या कार्यावर अंकूश ठेवत असेल किंवा सामान्य सभासद म्हणून त्या यंत्रणेचा उपभोक्ता असेल पण तो सहकार प्रणालीशी बांधील असतो हे मात्र खरे आहे.

असे असुन देखील सहकारातील काही अपप्रवृत्तींमुळे सहकार चळवळ बदनाम झाली आहे. सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यास सहकाराचा सुवर्णकाळ पुन्हा एकदा आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतील व त्याच्या लखलखाटाने सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र पुन्हा उजळून निघाला पाहीजे, सहकारास पुन्हा गत वैभव प्राप्त झाले पाहीजे. ही सदिच्छा 'पारिजात' परिवाराचा कुटूंबप्रमुख या नात्याने मी व्यक्त करतो. माझ्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

जय हिंद !    जय महाराष्ट्र !!    जय सहकार !!!

आपला सहकारी
**कैलास खोपडे**

# १३वा वार्षिक कार्य अहवाल सन २००९ - २०१०

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १३ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२००९ रु. | ३१/३/२०१० रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १२१.१२ | १३५.८० | १४.६८ | १२.१२ % |
| राखीव व इ.निधी | १२४.३१ | १४७.२८ | २२.९७ | १८.४८ % |
| सभासद ठेवी | २४०८.१६ | २९२४.१७ | ५१६.०१ | २१.४३ % |
| गुंतवणूक | ५२०.७२ | ७२८.२६ | २०७.५४ | ३९.८६ % |
| सभासद कर्जे | १८२३.७६ | २१६२.२२ | ३३८.४६ | १८.५६ % |
| खेळते भांडवल | २६९४.७५ | ३२६५.३५ | ५७०.६० | २१.१७ % |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : ५३४५

गतवर्षी संस्थेचे ५१६७ सभासद होते, अहवाल वर्षात ३८८ नवीन सभासद झाले आणि २१० सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ५३४५ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. १३५.८० लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,२१,१२,४००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १४,६७,५००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१० अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,३५,७९,९००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी : रु. १४७.२८ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, आकस्मिक निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. १,२४,३०,५८७/- होते त्या मध्ये अहवाल साली रु. २२,९७,३८२/- ने वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण स्वनिधी रुपये १,४७,२७,९६९/- इतका झाला आहे.

## ठेवी : रु. २९२४.१७ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात चांगली वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु.२४,०८,१६,१६३/- होत्या. त्यामध्ये रु. ५,१६,००,६६४/- ने वाढ होऊन दि.३१ मार्च २०१० अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.२९,२४,१६,८२७/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण २१.४३% इतके आहे. संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००६-०७ | सन २००७-०८ | सन २००८-०९ | सन २००९-१० |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | १,४९,३४,३७४ | १,९५,३०,०७४ | १,८३,२८,६४० | २,५८,२३,६०९ |
| दैनंदिन बचत ठेव | २,९३,१५,८३५ | ४,३०,६९,७६५ | ५,५९,३०,४७२ | ६,२८,९०,१३५ |
| अल्प मुदत ठेव | १,९४,६७,८०० | १,७६,४८,३६३ | २,३८,५१,२१३ | ४,३६,४१,३९४ |
| मुदत ठेव | १,९२,७५,१४६ | २,३०,६५,८७१ | ३,३०,६४,५१० | ४,१३,०६,४०० |
| दामदुप्पट ठेव | १,८५,५१,५६७ | १,६५,४३,८९६ | १,९९,४८,३९८ | १,७४,१८,१३४ |
| पारिजात बक्षीस ९८ | ७५,५३५ | ५७,५१५ | ३९,३२८ | ३४,२९६ |
| पारिजात बक्षीस ०० | ३,१६,००३ | २,१२,००३ | १,७८,००३ | १,७६,००३ |
| संकल्प सिद्धी ठेव | ३०,२८,३३४ | २८,२३,४१० | ३०,१९,४६४ | ३२,४४,१३७ |
| सिद्धी ठेव | ३१,१४,६८२ | १,१६,००० | ७६,००० | ५६,००० |
| मासिक प्राप्ती ठेव | १,५६,६४,२७५ | १,५९,२०,९५० | १,९०,१८,०७५ | २,३२,५२,१२५ |
| आवर्त ठेव | २२,२८,३९५ | १३,६६,८१८ | १६,७३,६९९ | २५,७६,१११ |
| सभासद ठेव | ३२,८२,७२३ | २९,५०,५७२ | २८,७३,६९८ | ३०,२०,५३० |
| शुभकार्य ठेव | २,१५,३४,८१० | २,७२,७३,८१६ | ३,१०,३५,४५७ | ३,८८,७३,९९३ |
| धनवृद्धी ठेव | - | १,५४,५५,९१० | १,४३,८३,९६८ | १,३५,८६,४२२ |
| धनलक्ष्मी ठेव | - | - | १,७३,९५,२३८ | १,६५,१७,५३८ |
| एकूण रु. | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ | २४,०८,१६,१६३ | २९,२४,१६,८२७ |

## गुंतवणूक : रु. ७२८.२६ लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन संस्थेने केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. ५,२०,७१,५८०/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. २,०७,५४,६४७/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. ७,२८,२६,२२७/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ३९.८६% एवढे आहे.

(रु.लाखात)

| गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|
| दि. ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा. राज्य. सह. पत. फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | ४५,०७,५३०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | १७,००,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | २,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ५६,०००.०० |
| सेवक कल्याण निधी | ४५,०००.०० |
| धर्मादाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | ६,६२,५४,६९७.०० |
| एकूण रु. | ७,२८,२६,२२७.०० |

## कर्जे : रु. २१६२.२२ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.१८,२३,७६,४२०/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.१६,९२,३७,०६०/-नव्याने कर्ज वाटप केले असून रु.१४,४९,५६,९८५/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. २१,६२,२१,६६७/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण ३.१६%

संस्थांच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकारखात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या बाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे आपल्या संस्थेची थकबाकी फक्त ३.१६% आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता ' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बॅकेने सर्व बँकाना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थाना सुद्धा एन.पी.ए.निकष लागू केले व अनुत्पादक कर्जाची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २०१० अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ६.४४ % आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे१५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१० अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | २००१.७१ | गरज नाही |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | १११.३६ | ५.५७ |
| | ब) संशयीत जिदंगी | ४९.१५ | १६.६९ |
| | क) बुडीत जिंदगी | - | -- |
| | एकूण | २१६२.२२ | २२.२६ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतूद रु. २२.२६ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु. २२.६० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. ३२६५.३५ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. २६९४.७५ लाख एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २१.१७ % प्रमाणे रु. ५७०.६० लाखाने वाढून रु. ३२६५.३५ लाख इतके झाले आहे.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १३ सभा होऊन एकूण २१६ ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या मिळून एकूण २३ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कामकाज नियंत्रण, कर्जवसुली यासाठी सुद्धा सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि.,तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., बृहन्मुंबई नागरी सह. पत. फेडरेशन मर्या.,व सहकार भारती प्रशिक्षण केंद्र,कराड यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अधिकारी वर्गातील व लिपीक वर्गातील एकूण १३ कर्मचाऱ्यांना टप्या टप्याने पाठविले.

## नफा विभागणी : रु. १२.६३ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु. १२,६२,८३६.६७ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ४०३.६० मिळून नफा रु. १२,६३,२४०.२७ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारास संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

(रु.लाखात)

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ३,१५,८१०.०० |
| लाभांश (५% प्रमाणे) | रु. | ६,०५,६२५.०० |
| बुडित कर्ज निधी | रु. | १,५०,०००.०० |
| थकीत व्याज तरतूद | रु. | १,४०,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | रु. | २०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रु. | ११,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा वर्ग | रु. | ८०५.२७ |
| एकूण | रु. | १२,६३,२४०.२७ |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे वैधानीक लेखापरिक्षण श्री. एम. एस. पाटील (चार्टर्ड अकौटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्‌गार काढले व संस्थेस 'अ' वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २००९-१० या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी बी. आर. सावंत अँड कंपनी, चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

### १) सभासदांसाठी 'पॅनकार्ड' सुविधा :

संस्थेने आपल्या सभासद-खातेदार यांचेसाठी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत दिले जाणारे 'पॅन कार्ड' पारिजात संस्थे मार्फत देण्याबाबत सामजस्य करार केला. त्यामुळे पारिजात संस्थेच्या सभासद-ठेवीदारांना पॅनकार्ड आता संस्थेमार्फत देण्याची सुविधा करण्यात आली. अशा प्रकारे पॅनकार्ड सुविधा पतसंस्थेच्या माध्यमातून देणारी 'पारिजात' ही एकमेव व प्रथम संस्था आहे.

### २) अधिकारी-पदाधिकारी चिंतन शिबिर

संस्थेने सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाच्या सुरवातीला तरी १३ व १४ एप्रिल ०९ रोजी सर्व शाखाधिकारी व संचालक यांचे संयुक्त चिंतन शिबीर लोणावळा येथे आयोजीत केले होते. त्यामध्ये संस्थेच्या गतवर्षातील कामकाजाचा आढावा घेऊन चालू आर्थिक वर्षातील उद्दीष्टपूर्तीसाठी करावयाच्या उपाययोजना, ग्राहकसेवा अधिक कार्यक्षम करणे व संस्थेची पुढील पाच वर्षातील वाटचाल यावर सविस्तर विचार मंथन करण्यात आले.

### ३) महिला दिन व जेष्ठ नागरीक दिन :

दि. ८ मार्च २०१० रोजी 'जागतीक महिला' दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या महिला कर्मचारी, महिला ठेव प्रतिनिधी तसेच महिला खातेदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्याच प्रमाणे दि. १ ऑक्टोबर २००९ रोजी 'जेष्ठ नागरिक दिन' विभागीय स्तरावर साजरा करण्यात येऊन संस्थेच्या जेष्ठ खातेदार, सभासद यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### ४) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनियम केंद्र पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात आले आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थामध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम ''पारिजात'' संस्थेने मिळविला आहे.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे,मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड,सहकार भारती, महाराष्ट्र राज्य सह.बँक, ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक , नवी मुंबई को-ऑप.बँक, कॉसमॉस को-ऑप.बँक, नॅशनल को-ऑप.बँक, अभ्युदय को-ऑप.बँक, महानगर सह.बँक,राजर्षी शाहु सहकारी बँक,ॲक्सिस बँक,दि.सातारा सहकारी बँक लि.,अपना सह.बँक लि.,कुर्ला नागरीक सह.बँक लि., दि. ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि., यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक मे. एम. एल. मोहोळकर, अंतर्गत लेखापरिक्षक श्री.बी.आर.सावंत (सनदी लेखापाल), सन २००९-१० सालाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. एम.एस.पाटील संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टमस्, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक,शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ,सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापुर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला सहकारी

बाळासाहेब ताकवले

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २०१०

| सन २००८-०९ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| १,२१,१२,४००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | १,३५,७९,९००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी** | | |
| ३८,१३,०९५.०० | राखीव निधी | ४३,३९,०४५.०० | |
| ६७,९४,५०६.०० | इमारत निधी | ७६,८८,२०१.०० | |
| १३,९०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | २२,६०,०००.०० | |
| १,८५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,८५,०००.०० | |
| ४६,०३०.०० | सभासद कल्याण निधी | ४६,७२४.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४३,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४३,०००.०० | |
| १२,९५७.०० | सहकार प्रशिक्षण निधी | २०,०००.०० | |
| ९२,०००.०० | आकस्मिक निधी | ९२,०००.०० | १,४७,२७,९६९.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| १,८३,२८,६४०.०० | बचत ठेव | २,५८,२३,६०९.०० | |
| ५,५९,३०,४७२.०० | दैनंदिन बचत ठेव | ६,२८,९०,१३५.०० | |
| २८,७३,६९८.०० | सभासद ठेव | ३०,२०,५३०.०० | |
| २,३८,५१,२१३.०० | अल्प मुदत ठेव | ४,३६,४१,३९४.०० | |
| ३,३०,६४,५१०.०० | मुदत ठेव | ४,१३,०६,४००.०० | |
| १,९९,४८,३९८.०० | दामदुप्पट ठेव | १,७४,१८,१३४.०० | |
| ३९,३२८.०० | पारिजात बक्षीस ठेव -१९९८ | ३४.२९६.०० | |
| १,७८,००३.०० | पारिजात बक्षीस ठेव -२००० | १,७६,००३.०० | |
| ७६,०००.०० | सिद्धी ठेव - २००१ | ५६,०००.०० | |
| ३०,१९,४६४.०० | संकल्प सिद्धी ठेव - २००३ | ३२,४४,१३७.०० | |
| १,९०,१८,०७५.०० | मासिक प्राप्ती ठेव | २,३२,५२,१२५.०० | |
| १६,७३,६९९.०० | आवर्त ठेव | २५,७६,१११.०० | |
| ३,१०,३५,४५७.०० | शुभकार्य ठेव | ३,८८,७३,९९३.०० | |
| १,४३,८३,९६८.०० | धनवृद्धी ठेव | १,३५,८६,४२२.०० | |
| १,७३,९५,२३८.०० | धन लक्ष्मी ठेव | १,६५,१७,५३८.०० | २९,२४,१६,८२७.०० |
| | **इतर देणी व तरतूदी :** | | |
| ६,०४,३३६.०० | ठेवीवरील देय व्याज | १२,१५,५८८.०० | |
| ६,७८,२३७.०० | लाभांश देणे | ७,८०,३६५.०० | |
| ०.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | ५०,०००.०० | |
| १,५०,०००.०० | रिटेंशन मनी | ०.०० | |
| २६,६७,९१,७२३.०० | पुढील पानवर..... | | ३२,०७,२४,६९६.०० |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००८-०९ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ६,००,९४४.४६ | रोख शिल्लक | १७,८४,९६४.२९ | |
| १९,८६,४७०.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | २४,६६,९४०.२८ | |
| २८,७७६.७० | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. | २३,९७८.७० | |
| ३४,७४३.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि. | २८,६७९.०० | |
| १६,०३,१३९.५२ | नवी मुंबई को-ऑप.बँक लि. | ७,१०,०८९.५३ | |
| ८,७५,०७८.३६ | अभ्युदय को-ऑप.बँक लि. | २२,१८,९९२.५० | |
| ७,८७,६८६.४५ | नॅशनल को-ऑप. बँक लि. | १४,१३,७१९.४५ | |
| ७,१५६.०० | अजित सहकारी बँक लि. | ५,०४५.०० | |
| १,२५,९३९.५० | राजश्री शाहू सहकारी बँक लि. | १,३३,७९७.०० | |
| ३,८९,१७७.६० | ॲक्सिस बँक लि. | १,२१,९६२.४९ | |
| २,३४३.०० | सोपानकाका सहकारी बँक लि. | ०.०० | |
| ४,७०,९६६.४८ | सातारा सहकारी बँक लि. | १,६४,२८४.८३ | |
| १२,०८१.०० | महानगर को-ऑप. बँक लि. | २,७४,०८५.०० | |
| १०,८६३.०३ | सारस्वत को-ऑप. बँक लि. | ७७५.७० | ९३,४७,३१३.७७ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| ३३,९९,२१०.०० | ठाणे जि.म.सह.बँक - राखीव व इतर निधी | ३९,१२,५३०.०० | |
| २३,१५,०००.०० | महा.राज्य सह.बँक - राखीव व इ.निधी | २६,५५,०००.०० | |
| ३६,२०,०००.०० | ठाणे जि. मध्य.सह.बँक - मुदत ठेव | २५,१६,०००.०० | |
| ३६,५०,०००.०० | महा.राज्य सहकारी बँक - मुदत व आर्वत ठेव | २९,००,०००.०० | |
| १,९७,४५,२०५.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत व आर्वत ठेव | १,०५,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक - मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| ५४,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप.बँक - मुदत व आर्वत ठेव | १,८१,५०,०००.०० | |
| ६४,३८,१६५.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक - मुदत व आर्वत ठेव | १,०३,३८,६९७.०० | |
| १०,००,०००.०० | ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| १०,००,०००.०० | अपना सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ४६,००,०००.०० | |
| ०.०० | महानगर को-ऑप. बँक लि.- मुदत व आर्वत ठेव | ९३,००,०००.०० | |
| ०.०० | नॅशनल को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | २४,५०,०००.०० | |
| ०.०० | कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.- मुदत ठेव | १५,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | द.म.कंळबे जावली सह.बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | |
| ५,००,०००.०० | सातारा सहकारी बँक लि. - मुदत ठेव | ०.०० | |
| २५,००,०००.०० | यु.टी. आय. फंड | २०,००,०००.०० | ७,२८,२६,२२७.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| ३,४०,६९,९३१.०० | वैयक्तिक जामिनकी कर्ज | ३,३७,२६,५१९.०० | |
| ५,०८,०४२.०० | व्यवसाय कर्ज | ५१,००९.०० | |
| ५८,०१,३९९.०० | वाहन तारण कर्ज | ६३,१२,८३०.०० | |
| १०,३१,८०,५९१.०० | सुरक्षित तारण कर्ज | १३,०४,७६,१११.०० | |
| ८५,२०,६५१.०० | इतर तारण कर्ज | ७६,६०,७४४.०० | |
| २१,१०,८७,५५९.१० | पुढील पानवर..... | | ८,२१,७३,५४०.७७ |

दि. ३१ मार्च २०१०

| सन २००८-०९ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|---|
| २६,६७,९१,७२३.०० | मागील पानावरुन....... | | ३२,०७,२४,६९६.०० |
| २५,३७०.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | ५५,७२४.०० | |
| ५,९००.०० | शेअर्स अनामत खाते | ०.०० | |
| ७,६१५.०० | व्यवसाय कर | ६,६२५.०० | |
| ५१,३७८.०० | आयकर टी.डी. एस. | ४७,९३५.०० | |
| ५२,४३२.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | ५८,०१४.०० | |
| २,००,०००.०० | लेखापरिक्षण फी | २,२१,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ६,३७३.०० | कर्मचारी विमा हप्ता | ६,४६७.०० | |
| ६,०००.०० | अतिरिक्त लाभ कर | ०.०० | |
| १३,३००.०० | टेलिफोन बिल | १३,९००.०० | |
| २१,४००.०० | विज बिल | २६,०००.०० | |
| ५,०००.०० | व्यवसायिक फी | ५,०००.०० | |
| ०.०० | इतर देणे | ५,१०४.०० | २४,९६,७२२.०० |
| १०,५०,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद : | | २०,५०,०००.०० |
| | नफा तोटा खाते : | | |
| ९४७.९२ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ४०३.६० | |
| १२,३२,२२६.६८ | आधिक : चालू वर्षाचा नफा | १२,६२,८३६.६७ | १२,६३,२४०.२७ |
| २६,९४,७४,६६५.६० | एकूण | | ३२,६५,३४,६५८.२७ |

| मे. एम. एस. पाटील | मे. बी. आर. सावंत अँड कं. | श्री. विजय बं. मोरे |
|---|---|---|
| चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक | चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक | मुख्य कार्यकारी अधिकारी |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००८-०९ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|---|
| २१,१०,८७,५५९.१० | **मागील पानावरुन........** | | ८,२१,७३,५४०.७७ |
| ११,३९,८२०.०० | शासकिय रोखे कर्ज | १६,४२,३४९.०० | |
| २२,८१,२७२.०० | दावा दाखल कर्ज | २०,२८,६०६.०० | |
| ११,९३,०७३.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ११,६३,१७२.०० | |
| १,५६,६११.०० | कर्मचारी वाहन कर्ज | २,३५,९९३.०० | |
| २,६०,३४८.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | २५,९०,३११.०० | |
| ११,१२,९२७.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | १५,३०,६८४.०० | |
| २,३३,९६,५२०.०० | ठेव तारण कर्ज | २,७५,३०,९२२.०० | |
| ७,५५,२३१.०० | सोने तारण कर्ज | १२,७२,४१७.०० | २१,६२,२१,६६७.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ५४,३७,०१९.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ४९,२८,९९२.०० | |
| १४,५०,८०८.०० | संगणक खाते | ११,९८,९८९.०० | |
| ३,५६,२१०.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | २,६७,१५७.०० | |
| ३,८१,४१५.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ३,८२,३०४.०० | |
| २,६९,९२१.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | २,३६,७१५.०० | |
| ५०,३८५.०० | इनव्हर्टर खाते | ५६,४०९.०० | |
| १,११,७८,८७६.०० | इमारत खाते | १,११,४६,२३४.०० | |
| ४४,२२१.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | ३६,९५४.०० | |
| १,४७८.०० | ग्रंथालय खाते | १,३३०.०० | |
| २१,०४४.०० | मोबाईल फोन खाते | १४,७३१.०० | १,८१,८९,०१५.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| १०,४७,७३६.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज (ओव्हरडयु) | २०,२१,८२०.०० | |
| १,५१,८६९.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज (नॉन ओव्हरडयु) | ४,६०,६५७.०० | २४,८२,४७७.०० |
| ६३,१३,७२४.०० | **गुंतवणूकीवरील येणे व्याज** | | ६०,५०,५४८.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ५,३०,०००.०० | कार्यालय अनामत | ७,३०,०००.०० | |
| १०,५५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | १०,५५०.०० | |
| ४२,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ४२,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| २,६६,०९४.५० | स्टेशनरी स्टॉक | २,४७,२७४.५० | |
| ८,०५०.०० | मुद्रांक साठा | १४,७००.०० | |
| ३८,५५०.०० | आगाऊ विमा | ३७,६८३.०० | |
| ९,४५४.०० | टी.डी.एस. व इतर येणे खाते | ८,९२५.०० | |
| २,७३,१०१.०० | प्राथमिक खर्च (शाखा उद्घाटन) | १,७८,३२२.०० | |
| ५५,४८५.०० | आगाऊ ग्रज्युइटी पेमेंट | ९९,७५१.०० | |
| ०.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | ९,३४५.०० | १३,८७,३१०.५० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| १,३६,५५०.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | | ३०,१००.०० |
| २६,९४,७४,६६५.६० | एकूण | | ३२,६५,३४,६५८.२७ |

श्री. अनंत ना. प्रभाळे
खजिनदार

श्री. कृष्णा पां. धुमाळ
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

दि. ३१ मार्च २०१०

| सन २००८-०९ रु. पैसे | खर्च | सन २००९-१० रु. पैसे |
|---:|---|---:|
| १,४८,४९,१०१.०० | सभासद ठेवीवरील व्याज | १,८५,४७,१६५.०० |
| ५,४२,८९६.०० | अधिकर्ष व्याज खर्च | ३,५८,०९३.०० |
| ३८,३७,६३५.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ता | ४५,२३,५७२.०० |
| ३,०९,४७५.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | ३,५७,८३२.०० |
| ४३,३२,५७२.०० | दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ५१,३२,४११.०० |
| ६,२५,८४०.०० | कार्यालय भाडे | ६,९६,०८६.०० |
| २,२९,५२३.५० | छपाई व स्टेशनरी खर्च | २,१४,३०१.५४ |
| ४८,८८०.०० | वार्षिक अहवाल खर्च | ३९,९३६.०० |
| १,५१,६००.०० | किरकोळ खर्च | १,६३,३०७.०० |
| ३,०१,९५६.०० | विज खर्च | ४,३०,३४६.०० |
| १,५४,८०४.०० | टेलिफोन खर्च | १,६९,०७४.०० |
| १,०४,३५१.०० | प्रवास खर्च | १,०३,३१८.०० |
| ५३,६३३.०० | विमा खर्च | ६२,०३२.०० |
| ३१,९७५.०० | तार व टपाल खर्च | २३,६६८.०० |
| ३३,५०९.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | ४,११,२९९.५० |
| १,७९८.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | १०,४३६.०० |
| ५४,३२८.०० | दिनदर्शिका छपाई खर्च | १,०४,५६०.०० |
| २,८९८.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | ९५२.०० |
| २,२१,७३१.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | २,५१,८९७.०० |
| ४,८३१.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | ९,५७५.०० |
| २०,९००.०० | कार्यालय साफसफाई (A.M.C.) | २५,६००.०० |
| १,७५०.०० | डेली कलेक्शन मशिन (A.M.C.) | १६,०८४.०० |
| १,००,८६९.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | २३,६४०.०० |
| ०.०० | कार्यालय देखभाल शुल्क | १,५८४.०० |
| ५४,७२२.०० | कार्यालय साफसफाई खर्च | ७०,४३२.०० |
| २,२१,८८४.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/अंतर्गत) | २,४२,२०८.०० |
| ११,००८.०० | कायदे विषयक सल्लागार फी | २९,४३६.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च (संस्था) | २,५००.०० |
| १,०००.०० | सभासदत्व व वर्गणी | १,०००.०० |
| ०.०० | कर्मचारी प्रशिक्षण खर्च | २५,२००.०० |
| ९.०३५.०० | दिपावली भेट खर्च | ३४,७८५.०० |
| ८८,३३९.०० | पुजा खर्च | ५७,८६८.७७ |
| २,६४,०५,३४३.५० | पुढील पानवर..... | ३,२१,४०,१९८.८१ |

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००८-०९ रु. पैसे | उत्पन्न | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|
| २,४७,४६,५५१.०० | सभासद कर्जावरील व्याज | ३,०६,९६,९०३.०० |
| ३७,६७,०७८.०० | गुंतवणुकीवरील व्याज | ५३,१३,०९८.२० |
| ५,१२,४४९.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस जमा | ५,४८,५४४.०० |
| ३,१५,१२४.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | २,८८,४६६.०० |
| १,९६,६९९.३५ | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | २,४१,७४०.३४ |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| ३,६३,७२५.०० | इतर जमा | १,५५,०००.०० |
| २,९९,०१,७७६.३५ | पुढील पानवर..... | ३,७२,४३,९०१.५४ |

दि. ३१ मार्च २०१०

| सन २००८-०९ रु. पैसे | खर्च | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|
| २,६४,०५,३४३.५० | मागील पानावरुन....... | ३,२१,४०,१९८.८१ |
| ६१,४३९.१७ | बॅक चार्जेस खर्च | ३५,३५२.०६ |
| १०,९६३.०० | सर्विस टॅक्स | ८,२४४.०० |
| ४,७७०.०० | कर व परवाना फी | २०,२८५.०० |
| २५,७४२.०० | अतिरिक्त लाभ कर | १७,६९०.०० |
| ४६,१६९.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ४५,७७७.०० |
| ९४,७७८.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | ९४,७७९.०० |
| ४९,७००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ६२,२५०.०० |
| १,९८०.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | १,५००.०० |
| ११,९३७.०० | फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च | ८,६८७.०० |
| ४४,२९७.०० | भेट व तपासणी खर्च | ६७,३५५.०० |
| ०.०० | लॉकर भाडे | १,२०३.०० |
| १,५९,५९७.०० | कर्ज वसुली खर्च | १,२२,११६.०० |
| १२,००४.०० | जाहिरात खर्च | २५,०३९.०० |
| ४९,३२४.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | ८१,५३१.०० |
| ६२,५२२.०० | निवडणूक खर्च | ०.०० |
| २,३१,०६१.०० | कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (LIC) खर्च | ४३,८२२.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी तरतूद | ५,०००.०० |
| ४,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद | ९,५०,०००.०० |
| ०.०० | संशयित व बुडित कर्ज निधी तरतूद | ६,७०,०००.०० |
| १३,८८,९२३.०० | घसारा | १५,८०,२३६.०० |
| १२,३२,२२६.६८ | निव्वळ नफा ताळेबंद वर्ग | १२,६२,८३६.६७ |
| २,९९,०१,७७६.३५ | एकूण | ३,७२,४३,९०१.५४ |

| | | |
|---|---|---|
| मे. एम. एस. पाटील<br>चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक | मे. बी. आर. सावंत अँड कं.<br>चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक | श्री. विजय बं. मोरे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००८-०९ रु. पैसे | उत्पन्न | सन २००९-१० रु. पैसे |
|---|---|---|
| २,९९,०१,७७६.३५ | मागील पानावरुन........ | ३,७२,४३,९०१.५४ |
| २,९९,०१,७७६.३५ | एकूण | ३,७२,४३,९०१.५४ |

| श्री. अनंत ना. प्रभाळे | श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २००८-०९)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम 81 (5-ब) आणि महाराष्ट्र सहाकारी संस्थाचा नियम 69 अन्वये द्यावयाचा)

मी, पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई, या संस्थेचे दि. 31.03.2009 रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक याची तपासणी केलेली आहे. या सर्व आर्थीक व्यवहाराच्या हिशोबाची स्टेटमेंटसची जबाबदारी व्यवस्थापकाची/पदाधिकाऱ्यांची असून आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या तपासणी प्रमाणे त्यावर आमचे मत / सूचना व्यक्त करणे एवढी आहे. आमची हिशेब तपासणी व लेखापरिक्षण हे भारतातील हिशोब तपासणीच्या सामान्यपणे स्वीकारलेल्या पध्दतीवर केलेली आहे. त्यानुसार आम्ही तपासणी काम चुकीच्या माहीतीवर व रेकॉर्डस्वर केलेले नाही. त्याची खात्री संस्थेकडून अपेक्षा ठेवून केलेली असते. तपासणीमध्ये नमुना तपासणी (टेस्ट चेक) केल्या जातात व त्या हिशोबात जुळतात की नाही आणि (अकौंटिंग प्रिन्सिपल)अंदाजपत्रक व आर्थीक व्यवहारांची नोंद नियमानुसार आहे कि नाही हे पाहीले जाते. आमच्या हिशोब तपासणीवरुन व्यक्त केलेली आमची मते ही योग्य त्या आधारावर केलेली आहेत असे आम्हास वाटते. आमच्या निरीक्षणावरुन वरील मतांव्यतिरिक्त आम्ही आमचा अहवाल खालीलप्रमाणे देत आहोत.

1. आमच्या मते आम्हाला पुरविलेली माहिती,दिलेले, खुलासे व हिशोब पुस्तकावरुन संस्थेने तयार केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या व्यवहाराचे योग्य व अचूक दर्शन घडविणारे आहे.
2. जेव्हा आम्ही खुलासे अथवा माहीती मागविली त्यावेळेस सर्व खुलासे माहीती संस्थेने समाधानकाररीत्या पुरविली आहे.
3. आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे सर्व व्यवहार हे संस्थेच्या अधिकार क्षेत्रातील आहेत.
4. संस्थेच्या नफा-तोटा पत्रकात दाखविण्यात आलेला नफा या वर्षाच्या हिशोब पत्रकांशी. सुसंगत व बरोबर आहे.
5. आमच्या मते ताळेबंद पत्रक आणि नफा-तोटा पत्रक हे प्रचालित कायद्याच्या तरतुदीनुसार करण्यात आलेले आहे.
6. आमच्या मते प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार संस्थेने हिशोबांच्या सर्व वह्या, पुस्तके ठेवली आहेत.
7. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहू सन 2008-2009 सालाकरिता संस्थेस लेखापरीक्षण वर्ग '' **अ*** '' देण्यात येत आहे.

स्थळ : ठाणे
दिनांक : ९/७/२००९
प्राप्त दिनांक : २४/८/२००९

श्री. एम, एल्. मोहोळकर
सनदी लेखापाल

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २००९-२०१०)

पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नेरुळ, नवी मुंबई जि. ठाणे या दिनांक ३१ मार्च २०१० रोजीचा ताळेबंद व दिनांक ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षाचा नफा-तोटा पत्रक आम्ही तपासले आहे.

सदर आर्थिक पत्रक बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. सदर आर्थिक पत्रकांवर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतातील प्रचालित लेखापरिक्षणाच्या मानदंडाना अनुसरुन केले आहे. ह्या मानदंडानुसार आम्हांला आमच्या लेखापरिक्षणाची आखणी आणि अंमलबजावणी अशा पध्दतीने करावी लागते की ज्यामागे ह्या आर्थिक पत्रकांत लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण खात्री पटेल. लेखापरिक्षणात हिशोब मांडणीची मुलतत्त्वे पाळली जातात किंवा नाही आणि व्यवस्थापनाने मांडलेले अंदाज हे योग्य आहेत की नाहीत ह्याची पडताळणी केली जाते. आमच्या मते ह्या आर्थिक पत्रकांवर मत प्रदर्शन करण्यासाठी आमचे लेखापरिक्षण पुरेसे आहे. वर नमूद केलेल्या लेखापरिक्षण पध्दतीस आधीन राहून आम्ही अहवाल देतो की,

१. आम्हांस आवश्यक वाटलेले सर्व खुलासे व मागविलेली माहिते संस्थेने समाधानकारकरित्या पुरविलेली आहे.

२. आमच्या मते प्रचालित कायद्याच्या तरतुदीनुसार संस्थेने हिशोबची सर्व पुस्तके ठेवलेली आहे.

३. हिशोब पुस्तकांवरून संस्थेने तयार केलेले व आम्ही लेखापरिक्षण केलेले ताळेबंद व नफातोटा पत्रक संस्थेच्या हिशोब पुस्तकांशी जुळत आहेत व प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार तयार करण्यात आले आहेत.

४. आमच्या मते आम्हांला पुरविलेली माहिती, दिलेले खुलासे, प्रचलित हिशोब मांडणीच्या मुलतत्वानुसार संस्थेने तयार केलेले उपरोक्त मुदतीचे हिशोब व आर्थिक पत्रके ही आमच्या लेखापरिक्षण अहवालातील सूचना, शेरे ह्यास पात्र राहून संस्थेच्या व्यवहाराचे योग्य व अचूक दर्शन घडवणारी आहेत.

५. वरील परिक्षणाच्या आधारे संस्थेचा सन २००९-२०१० साठी ऑडिट वर्ग 'अ' निश्चित करीत आहेत.

**मे. एम. एस. पाटील**
चार्टर्ड अकौटंट
सही
(एम्. एस्. पाटील)
एम. नं. ३८५७३

स्थळ : नेरुळ, नवी मुंबई
दिनांक : २४/६/२०१०

## अंदाज पत्रक सन २०१०-२०११

(रु.लाखात)

| उत्पन्न | अंदाजे उत्पन्न २००९-२०१० | प्रत्यक्ष उत्पन्न २००९-२०१० | अंदाजे उत्पन्न २०१०-२०११ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ३०४.०० | ३०६.९७ | ३६०.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ४७.०० | ५३.१३ | ७०.०० |
| इतर उत्पन्न | १८.०० | १२.३४ | १३.०० |
| एकूण रु. | ३६९.०० | ३७२.४४ | ४४३.०० |

| खर्च तपशील | अंदाजे खर्च २००९-२०१० | प्रत्यक्ष खर्च २००९-२०१० | अंदाजे खर्च २०१०-२०११ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज * | १८०.०० | १८५.४७ | २३२.०० |
| कर्मचारी पगार, बोनस, भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च | ५२.०० | ४९.२६ | ५९.७० |
| दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ५१.५० | ५१.३२ | ५९.०० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ५.५० | ३.५९ | ५.५० |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | १.५० | १.०८ | १.४५ |
| प्रवास, किरकोळ, दिवाळी भेट, गणवेश, व्हिजीट खर्च | ५.३० | ३.६८ | ६.०५ |
| विमा व पोस्टेज खर्च | १.०० | ०.८६ | १.१५ |
| विज, फोन, पाणी, कर, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व अतिरिक्त लाभ कर इ. | १५.७५ | १३.७५ | १५.९० |
| देखभाल व दुरुस्ती, उद्घाटन, पुजा, फेस्टीव्हल, कार्यालय सर्विस चार्ज, साफसफाई खर्च, सिक्युरिटी गार्ड खर्च * | ६.०० | ७.२७ | ५.८० |
| ऑडीट फी खर्च | ३.०० | २.४२ | ३.०० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी | ३.७६ | ३.३७ | ४.५५ |
| ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | ८.५० | ३.९४ | ५.७३ |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | २.५० | १.४७ | ३.०० |
| घसारा खर्च | १६.६५ | १५.८० | १६.०० |
| तरतूदी (शिक्षण निधी, बुडीत कर्ज निधी व थकित व्याज निधी)* | १.०० | १६.२५ | ८.०० |
| अन्य खर्च | १.०० | ०.२८ | ०.५० |
| नफा | १४.०४ | १२.६३ | १५.६७ |
| एकूण रु. | ३६९.०० | ३७२.४४ | ४४३.०० |

*अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मंजुरी दिली असून वा.स.सा. सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

## संचालक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२०१०अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०१०अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ३६,५९,१०२.०० | ०.०० | ०.०० |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२०१०अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०१०अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ३०,३८,०८४.०० | ०.०० | ०.०० |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ८३,३८,५०० | ९५,३५,७०० | १,०६,८५,००० | १,२१,१२,४०० | १,३५,७९,९०० |
| गुंतवणूक | ३,०२,९८,८५० | ३,३२,५१,८५० | ३,७७,०२,०२८ | ५,२०,७१,५८० | ७,२८,२६,२२७ |
| ठेवी | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ | २४,०८,१६,१६३ | २९,२४,१६,८२७ |
| कर्जे | ८,०४,५४,७५५ | ११,८२,००,२८१ | १५,१२,६२,१२९ | १८,२३,७६,४२० | २१,६२,२१,६६७ |
| खेळते भांडवल | १२,९६,१२,२१४ | १७,३२,६६,७६४ | २१,१७,५२,८५५ | २६,९४,७४,६६५ | ३२,६५,३४,६५८ |

## सभासदांना सूचना :

- ❖ सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याबाबत कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ❖ ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- ❖ सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- ❖ कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- ❖ पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- ❖ आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- ❖ प्रत्येक महिनाच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. याबाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी,
- ❖ संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,<br>नवी मुंबई - ४०० ७०६. |
| मुख्य कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट न. १८, सेक्टर १०ए, नेरुळ (प.),<br>नवी मुंबई- ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर. (सी.आर.) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ५३४५ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. १,३५,७९,९००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. १,४७,२७,९६९.०० |
| ठेवी | : | रु. २९,२४,१६,८२७.०० |
| कर्जे | : | रु. २१,६२,२१,६६७.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. ७,२८,२६,२२७.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | "अ"(२००९-२०१०) |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १२,६३,२४०.२७ |
| कर्मचारी वर्ग | : | ५२ |
| खेळते भांडवल | : | रु. ३२,६५,३४६५८.२७ |

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पॅनकार्ड सुविधा फक्त रु.९४/-

## खुशखबर

पॅनकार्ड सुविधा फक्त रु.९४/-

केंद्र शासनाच्या आयकर विभागाने बंधनकारक केलेले



# पॅनकार्ड



आता पारिजात संस्थेमार्फत सर्व नागरीकांस उपलब्ध.

पतसंस्थेच्या माध्यमातून अशी सेवा देणारी 'पारिजात'
पहिली व एकमेव संस्था.

---



# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यार्थी गुण गौरव सोहळा

### सन २००९-१०

सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २००९-१० या शैक्षणिक वर्षात इयत्ता १०वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७०% गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक २४/७/२०१० पर्यंत संस्थेच्या कार्यालयात त्वरीत पाठवावे. अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.

## विविध ठेव योजना :-

### 'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत.... कुटुंबातील सर्वांसाठी

**व्याजदर (दि. ३/७/२००९ पासून)**

| | |
|---|---|
| ४६ ते १८० दिवस | ८.०० % |
| १८१ ते ३६४ दिवस | ९.०० % |
| १ वर्ष ते २ वर्षापेक्षाकमी | १०.०० % |
| २ वर्ष ते ३ वर्षापेक्षाकमी | १०.२५ % |
| ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षाकमी | १०.५० % * |
| ४ वर्ष ते ५ वर्षापेक्षाकमी | ११.०० % |
| ५ वर्ष व आधिक | १०.०० % |

* जेष्ठ नागरिकांना ½ % अधिक व्याज

**मासिक प्राप्ती योजना**

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी रु. १,०९,१००/- गुंतवा व दरमहा रु. १०००/- पेन्शन रुपये व्याज मिळवा.

**शुभकार्य ठेव योजना**

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

**लखपती मुदत ठेव योजना**

| | | |
|---|---|---|
| रु. ६२,१००/- | ५ वर्षात | रु.१ लाख |
| रु. ५८,२५०/- | ६८ महिन्यात | रु. १ लाख |

**दामदुप्पट ठेव योजना**

डबल धमाका

आपली रक्कम ८४ महिन्यात दामदुप्पट

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते.

## विविध कर्ज योजना :-

### स्वप्न तुमचे ... सहाय्य आमचे

❁ गृहपयोगी उपकरणे ❁ फर्निचर ❁ संगणक ❁ शिक्षण ❁ वाहन ❁ मशिनरी ❁ घरदुरुस्ती ❁ लग्नकार्य ❁ वैद्यकीय ❁ धार्मिक कार्य ❁ व्यवसाय वृद्धी

### विविध कर्ज योजना

**वैयक्तीक कर्ज**
रु. ७५,०००/-
व्याजदर १७%

**वाहन तारण कर्ज**
रु. १०.०० लाख
व्याजदर १५%

**तारण कर्ज**
रु. २५.०० लाख पर्यंत
व्याजदर १४%

**तत्काळ कर्ज**
ठेव तारण
LIC / NSC
सोने तारण



संस्थेचे सर्वोत्कृष्ठ दैन. ठेव प्रतिनीधी श्री. दत्तात्रय श्रीपती साळेकर पुरस्कार स्विकारताना.



संस्थेने आयोजीत केलेल्या चिंतन शिबीर प्रसंगी ह.भ.प. गुरुवर्य श्री. बाबा महाराज सातारकर यांचे समवेत संस्थेचे पदाधिकारी व अधिकारी.




संस्थेने आयोजीत केलेल्या विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थीनीस स्मृती चिन्ह व पारितोषीक मा. अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आले.




संस्थेच्या दैन. ठेव प्रतिनीधी सौ.निकीता ना. सावंत यांचा मा.सौ.मंदा ज्ञा. खोपडे(संचालिका) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

| | |
|---|---|
| **वाशी** | अे-३/७, सेक्टर १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ / ३२०८६६६४ |
| **नेरुळ** | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर ८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९६९८५ |
| **दादर** | सुभद्रा बिल्डींग, रुम नं. ११, बी-९, पहिला मजला, आर. के. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : ३२०८६६६५ |
| **कोपरखैरणे** | शॉप नं. २, प्लॉट नं. १९, स्वागत अपार्टमेंट, सेक्टर ३, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. फोन : ३२४८६८०६ |
| **न्यु पनवेल** | अश्वमेघ, शॉप नं.१७, प्लॉट नं. १८, सेक्टर ८, सातारा सह. बँकेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल - ४१० २०६. फोन : ३२६७४६५८ |

## पुणे विभाग

| | |
|---|---|
| **धनकवडी** | सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९०६७४६ |
| **हडपसर** | अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-३२५१७६७१ |
| **सिंहगड रोड** | सर्व्हे नं. १९/१७, आनंद नगर, सोमनाथ दुग्धालया जवळ, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१. फोन : ०२०-३२५३११०२ |
| **चंदननगर** | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. ४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ०२०-३२३११७२२ |

प्रेषक :

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई**

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ(प.), नवी मुंबई ४०० ७०६. फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७

बुक - पोस्ट

प्रति ,